-१४-

एतदर्थ मंडळाच्या हिन्दी भाषा परीक्षा राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी उत्तीर्ण होण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक हिंभाप-१०८२/९०७/प्र-२०३/वीस,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ जानेवारी १९८३.

पहा :- (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक हिंभाप-१७८०/२८, दिनांक १७ जुलै १९८० — पृ. 323

(२) शासन शुद्धीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक हिंभाप-१०८०/वीस, दिनांक ११ ऑगस्ट १९८१. — पृ. 337

शासन निर्णय :- शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी एतदर्थ मंडळाच्या हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्याची कालमर्यादा ३० जून १९८१ पर्यंत होती, ती ३० जून १९८२ पर्यंत वाढविण्यात आली आहे. जे अधिकारी व कर्मचारी ३० जून १९८२ पर्यंत सदर परीक्षा उत्तीर्ण झाले नसतील, त्यांना ३० जून १९८२ च्या पुढे मुदतवाढ मिळणार नाही.

२. १ जुलै १९८१ ते ३० जून १९८२ या कालावधीत हिन्दी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झाल्यामुळे अथवा हिंदी भाषा-परीक्षेतून सूट न मिळाल्यामुळे ज्यांची वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे, अशा अधिका-यांना कर्मचा-यांना देय असलेली वेतनवाढ व वेतनवाढीची थकबाकी देण्यात यावी असेही आदेश देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

जिल्हाधिकारी रत्नागिरी
- कार्यालय -
22 MAR 1983

र. दा. रणदिवे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.